13-03-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 03/12/2025 11:29 PM Page 1



निवडक



मडगाव: केंद्रीय मंत्री राजीव रंजन सिंग यांच्याहस्ते पुरस्कार स्वीकारताना सुवर्णा प्रभू तेंडुलकर

## सुवर्णा तेंडुलकर यांना राष्ट्रीय महिला पुरस्काराने सन्मानित

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. १२ :** महिला दिनानिमित्त नवी दिल्ली येथे झालेल्या सोहळ्यात दक्षिण गोवा जिल्हा पंचायतीच्या माजी अध्यक्ष सुवर्णा प्रभू तेंडुलकर यांना उत्कृष्ट महिला लोकप्रतिनिधी या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पंचायत राज केंद्रीयमंत्री राजीव रंजन सिंग यांच्याहस्ते त्यांना हा पुरस्कार बहाल करण्यात आला. यावेळी पंचायत राज राज्यमंत्री प्रा. एस. पी. सिंग बादेल, केंद्रीय महिला व बाल कल्याण खात्याच्या राज्यमंत्री अन्नपूर्णा देवी, पंचायत राज खात्याचे केंद्रीय सचिव विवेक भारद्वाज, अतिरिक्त सचिव सुशीलकुमार लोहानी उपस्थित होते. .

---

## साळ गडे उत्सवात रात्री येणाऱ्या भाविकांसाठीच्या मार्गाच्या वेळेत बदल

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. १२ :** साळ गडे उत्सवासाठी रात्रीच्यावेळी येणाऱ्या हजारो भाविकांच्या मनात वेळेबद्दल निर्माण झालेल्या संभ्रमावर तोडगा काढण्यासाठी श्री भूमिका मंदिराच्या सभामंडपात श्री महादेव भूमिका देवस्थान समिती, गडे सदस्य, महाजन व ग्रामस्थ यांच्यात आता तातडीची बैठक बोलावण्यात आली व प्रवेश करण्याच्या बाबतीत निर्माण झालेल्या संभ्रमावर तोडगा काढण्यात आला. साळमध्ये प्रवेश करता येणाऱ्या मार्गांच्या वेळेत बदल करण्यात आला. त्यात प्रामुख्याने धुमासे मार्गे येणाऱ्या भाविकांसाठी धुमासे येथील श्री सातेरी पुरमार मंदिराजवळ रात्री १० वाजता हा रस्ता बंद करण्यात येईल तर कासारपाल मार्गे येणाऱ्या भाविकांना ११ पर्यंत प्रवेश करता येणार आहे तर दोडामार्ग हा रस्ता पूर्ण रात्रभर चालूच राहील याची दखल घ्यावी पण गडे संपल्यानंतर मात्र भाविकांना ४.३० ते ५ च्या दरम्यान परत जाता येईल तसेच कुठेही प्रामुख्याने गेट नसणार पण पोलीस बंदोबस्त असणार आहे त्यामुळे भाविकांनी पोलिसांना योग्य ते सहकार्य करणे आवश्यक आहे या तातडीच्या बैठकीत देवस्थान समितीचे अध्यक्ष– कालिदास राऊत, सचिव – विशाल परब व इतर सदस्य त्याचप्रमाणे गडे सदस्य – सुरेश परब , नारायण राऊत, पांडुरंग परब, आदिनाथ परब, संतोष राऊत, शांबा घुरे, सखाराम परब, रामा राऊत, लाडू परब ,सगुण राऊत तसेच महाजन अर्जुन परब, सत्यवान परब, साईश राऊत, गोपाळ परब, सुरेश राऊत, संतोष एकनाथ राऊत, शैलेश राऊत व अनेक जण या बैठकीत सहभागी झाले होते.

---

## पारोडा येथे जलवाहिनी फुटून लाखो लिटर पाणी वाया

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि.१२ :** मुसाळ, पारोडा येथे साळावलीतून वास्को येथे जलपुरवठा करणारी जलवाहिनी फुटल्याने लाखो लिटर पाणी वाया गेले. जलस्त्रोत खात्याकडून याठिकाणी काम सुरू होती. त्यावेळी जलवाहिनीला जेसीबी लागून जलवाहिनी फुटल्याची माहिती सूत्रांनी दिली. जलवाहिनी फुटल्यानंतर पाण्याचे मोठे कारंजे हवेत उडू लागले. मंगळवारी दुपारी जलवाहिनी फुटण्याचा हा प्रकार घडला. जलवाहिनी फुटल्याने सासष्टी तसेच मुरगाव तालुक्यातील जलपुरवठ्यावर परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. दरम्यान, जलवाहिनी दुरुस्त करून जलपुरवठा सुरळीत करण्यासाठी प्रयत्न सुरू होते.

---

## मराठी शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रोत्साहनपर तीनशे रुपये लालफितीत?

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. १२ :** देशात व राज्यात भाजपचे डबल इंजिन सरकार कार्यरत आहे. मराठी भाषा राजभाषा व्हावी, असे प्रयत्न मराठी समर्थक करीत आहेत. तर गोवा सरकार जाणूनबुजून अपशकुन करीत असल्याचे चित्र दिसते आहे. विशेष म्हणजे मराठी शाळा जिवंत ठेवण्यासाठी सरकारने मराठी शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन पर प्रत्येकी रुपये तीनशे देण्याचे आश्वासन दिल्यास वर्षे लोटली, मात्र त्यांची अमंलबजावणी होत आहे का, असा प्रश्न आहे.

सध्याच्या परिस्थितीत नवीन शैक्षणिक धोरण अमलात येण्याची शक्यता असल्याने त्या सानुग्रहाची अमंलबजावणी होण्याची चिन्हे धूसर बनली असल्याचे दिसून येते. मराठी शाळा टिकून राहण्यासाठी सरकारने नामी शक्कल लढवली, मात्र त्याची अंमलबजावणी न केल्याने, हेतू साध्य झाला. पालकांना दिलासा देणारे आश्वासन न पाळल्याने सरकारने आम्हाला फसविले असा समज काही पालकांत बनल असून,कित्येकांनी संताप व्यक्त केला आहे.

# आगोंद बीचवर उच्च न्यायालयाचा दणका

## ८ दुकाने सील : उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर प्रदूषण मंडळाला जाग

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. १२ :** उच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार, मंगळवारी आगोंद बीचवर आठ मालमत्ता सील करण्यात आल्या, तर इतर मालमत्तांचे चालकांनी स्वेच्छेने पाडकाम केले. ही कारवाई उच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार करण्यात आली. कारवाईदरम्यान तीन रिसॉर्ट आणि शॅक चालकांनी वैध प्रदूषण नियंत्रण मंडळाची प्रमाणपत्रे सादर केल्यामुळे त्यांचे सीलिंग टळले.

६ मार्च रोजी उच्च न्यायालयाने प्रदूषण नियंत्रण मंडळाला पर्यावरण नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी आगोंद बीचच्या दक्षिण टोकावर असलेल्या २० आस्थापनांविरोधात कारवाईचे आदेश दिले होते.



मंगळवारी सकाळी उपजिल्हाधिकारी मधू नार्वेकर, मामलतदार मनोज कोरगावकर, काणकोणचे बीडीओ सॅव्हियो कुतिन्हो (सीलिंगसाठी नोडल अधिकारी), आगोंद पंचायत सचिव अमोल नाईकगावकर, वीज विभागाचे जेई चारी आणि जीएसपीसीबीचे जेई राज मोहन प्रभुदेसाई यांच्या नेतृत्वाखाली कारवाई करण्यात आली. सीलिंग प्रक्रियेदरम्यान एका मालमत्ता मालकाने वीज तोडण्याला आक्षेप घेतला. न्यायालयाच्या आदेशात वीज तोडण्याचा उल्लेख नसल्याचा युक्तिवाद करत त्याने वीजपुरवठा सुरू ठेवण्याची मागणी केली. मात्र, संभाव्य शॉर्ट सर्किट टाळण्यासाठी वीजपुरवठा खंडित करणे आवश्यक असल्याचे उपजिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

याशिवाय, यापूर्वी सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर बंद करण्यात आलेल्या एका मालमत्तेवर प्रदूषण नियंत्रण मंडळाने पुन्हा कारवाई केली. मालकाने विरोध केल्यानंतरही अधिकाऱ्यांनी ती मालमत्ता सील करून वीजपुरवठा खंडित केला. दोन मालमत्ता मालकांनी जीएसपीसीबी मंजुरीसाठी अर्ज प्रलंबित असल्याचे सांगितले. अधिकाऱ्यांनी मंजुरी मिळाल्यास सील काढण्याचे आश्वासन दिले.

गेल्या दोन दिवसांपासून पाडकाम सुरू असलेल्या पाच इमारतींसाठी ही प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत काम सुरू ठेवण्याची परवानगी देण्यात आली. दरम्यान, अधिकाऱ्यांनी सीलिंगसाठी येत असल्याचे पाहून चार रिसॉर्ट्सच्या चालकांनी स्वेच्छेने पाडकाम सुरू केले. एकूण नऊ मालमत्तांची स्वेच्छेने तोडफोड करण्यात आली.

सीलिंगच्या वेळी काही मालमत्तांमध्ये पर्यटक होते. अधिकाऱ्यांनी अंमलबजावणीपूर्वी त्यांना बाहेर पडण्याची परवानगी दिली. रिसॉर्टच्या विस्तृत परिसरामुळे अधिकाऱ्यांनी फक्त मुख्य प्रवेशद्वार सील करण्याचा निर्णय घेतला. शॅक्स आणि रेस्टॉरंट्स सील न करता त्यांचा वीजपुरवठा बंद करण्यात आला. तथापि, उल्लंघन केल्यास कठोर कारवाई आणि दंड ठोठावण्यात येईल, असा इशारा अधिकाऱ्यांनी दिला. उपजिल्हाधिकाऱ्यांना या कारवाईचा सविस्तर अहवाल उच्च न्यायालयात सादर करण्याचे निर्देश न्यायाल्याकडून देण्यात आले आहेत.

# गोवा यंग इनोव्हेटर पुरस्कार २०२४–२५ चे वितरण

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. १२ :** गोवा स्टेट इनोव्हेशन कौन्सिल तर्फे डॉन बॉस्को कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, फातोर्डा येथे आयोजित करण्यात आलेल्या गोवा यंग इनोव्हेटर पुरस्कार २०२४–२५ च्या अंतिम फेरीत विजेत्यांची घोषणा करण्यात आली. तरुण प्रतिभांना सर्जनशीलतेला चालना देण्यासाठी आयोजित या स्पर्धेत गोव्याच्या विद्यार्थ्यांनी नाविन्यपूर्ण कल्पना आणि व्यावहारिक उपाय सादर केले. कार्यक्रमाची सांगता उत्साहपूर्ण वातावरणात पारितोषिक वितरण समारंभाने झाली.

स्पर्धेत इयत्ता आठवी–नववी आणि इयत्ता पाचवी–सातवी अशा दोन श्रेणींमध्ये मोठ्या प्रमाणात विद्यार्थी सहभागी झाले होते. प्रकल्पांचे मूल्यांकन मौलिकता आणि उपयोगिता या निकषांवर करण्यात आले. सकाळी १० ते दुपारी ३ दरम्यान आयोजित प्रदर्शनात विद्यार्थी, शिक्षक आणि व्यावसायिकांनी नवोन्मेषकांशी संवाद साधला आणि त्यांची नाविन्यपूर्ण कामगिरी समजून घेतली.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाचे संचालक अंकित यादव (आयएएस) यांनी सहभागी विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेचे कौतुक केले. यादव म्हणाले, तरुण नवोपक्रमकर्त्यांचे विचार समाजात सकारात्मक बदल घडवू शकतात. अशा उपक्रमांना सातत्याने पाठिंबा दिला जाईल.

**विजेत्यांची यादी**

वर्ग १ (इयत्ता आठवी–नववी) – पहिले पारितोषिक (रु. २०,०००) : चबी चीक्स स्प्रिंग व्हॅली हायस्कूलचे मोहम्मद रझी फारुकी आणि सुशांत शर्मा यांनी श्रेडझिला' प्रकल्पासाठी फ्रेडरिक डायस यांच्या मार्गदर्शनाखाली प्रथम पारितोषिक पटकावले.

दुसरे पारितोषिक(रु. १०,०००) : कुडचडेच्या द न्यू एज्युकेशनल इन्स्टिट्यूटचे पूर्वेश गौरीश बोरकर यांना अग्निशमन ड्रोन' प्रकल्पासाठी गौरीश एल. बोरकर यांच्या मार्गदर्शनाखाली दुसरे स्थान मिळाले.

प्रोत्साहन पारितोषिक (रु. ५,०००) : सोफिया फर्नांडिस यांच्या मार्गदर्शनाखाली 'फिनिक्स – मेडिकेअर' प्रकल्पासाठी प्रोत्साहन पारितोषिक प्रदान करण्यात आले.

**वर्ग २ (इयत्ता पाचवी–सातवी) :**

पहिले पारितोषिक (रु. २०,०००): श्री महालसा नारायणी हायस्कूल, वर्णा येथील आयुष शिंदे, वेदांत आडारकर आणि सोहम गुरव यांनी 'जीवन अमृत' प्रकल्पासाठी प्रियंका पी. पेडणेकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रथम पारितोषिक जिंकले.

दुसरे पारितोषिक (रु. १०,०००) : जीव्हीएमच्या एजे दे अल्मेडा हायस्कूल, फोंडा येथील सुमुख अगस्तीपूरकर यांनी 'ग्रीनहाऊस २.०' प्रकल्पासाठी मानसी बखले यांच्या मार्गदर्शनाखाली दुसरे पारितोषिक मिळवले.

प्रोत्साहन पारितोषिक (रु. ५,०००) : शारदा मंदिर स्कूल, पणजी येथील रोनव चोडणकर आणि एरियाना चोडणकर यांनी 'इंटेलिजेंट स्ट्रोक मॅनेजमेंट सिस्टम' प्रकल्पासाठी डॉ. दीपा चोडणकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रोत्साहन पारितोषिक पटकावले.

# दयानंद सामाजिक सुरक्षा योजनेत ६ हजार बोगस लाभार्थी; १३ कोटी वसूल

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १२ :** राज्य सरकारने दयानंद सामाजिक सुरक्षा योजनेतील (डीएसएस) सुमारे ६,००० बोगस लाभार्थ्यांची ओळख पटवून त्यांच्या खात्यात जमा झालेल्या सुमारे १३ कोटी रुपयांची वसुली केल्याची माहिती समाज कल्याण मंत्र्यानी दिली आहे.

समाज कल्याण संचालनालयाने राज्यव्यापी सर्वेक्षणाद्वारे अनुपस्थित आणि मृत लाभार्थ्यांची तपासणी सुरू केली होती. या मोहिमेअंतर्गत आतापर्यंत ६,००० हून अधिक बोगस लाभार्थ्यांना यादीतून हटवण्यात आले आहे.

माध्यमांशी बोलताना फळदेसाई म्हणाले की, पहिल्या टप्प्यात ६ हजार बोगस लाभार्थ्यांची ओळख पटली असून आतापर्यंत १३ कोटी रुपये वसूल करण्यात आले आहेत. आणखी काही प्रकरणे पुढे येण्याची शक्यता आहे आणि त्यानुसार पुढील वसुली सुरू राहील.

फळदेसाई यांनी स्पष्ट केले की, बँकांनी कालबाह्य झालेल्या लाभार्थ्यांची पासबुके अद्यतनित केली नाहीत आणि त्यामुळे ही रक्कम बँकांमध्येच राहिली. तसेच, मृत्यू प्रमाणपत्रे सादर न केल्यामुळे अनेक लाभार्थ्यांना पेमेंट सुरूच राहिले होते.

१.४० लाख लाभार्थ्यांची मर्यादा गाठली असल्याने सध्या नवीन अर्ज स्वीकारले जात नाहीत. मात्र, बोगस लाभार्थ्यांना यादीतून काढून टाकल्यानंतर नव्या अर्जांना संधी मिळेल. या निर्णयामुळे पात्र लाभार्थ्यांना किमान २,५०० रुपये मासिक पेन्शन मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे, असे फळदेसाई म्हणाले.

फळदेसाई यांनी योजनेच्या पेमेंट वितरणात काहीसा विलंब झाल्याचे मान्य केले. तांत्रिक आणि प्रशासकीय कारणांमुळे एक–दोन महिन्यांचा विलंब होत आहे. मात्र, आम्ही ही प्रक्रिया गतीने पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील आहोत, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# मये येथे काजू बागायतीस आग; लाखोंची हानी

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. १२ :** मये पंचायत क्षेत्रातील देऊसभटवाडी येथे डोंगरमाथ्यावरील काजूबागायतीला मंगळवारी संध्याकाळी वीज वाहिन्यांमध्ये झालेल्या घर्षणामुळे पडलेल्या ठिणगीतून आग भडकली. या आगीत सुमारे ८० हजार चौ.मी. जमिनीतील काजू बागायत जळूनखाक झाली. त्यामुळे लाखो रुपयांचे नुकसान झाले.

सदर आगीची घटना संध्याकाळी ४.३० वाजता च्या सुमारास घडली. या काजू बागायतींमधून गेलेल्या उच्च दाबाची विद्यूत वाहिनी गेली आहे. दरवर्षी या वाहिन्यांमध्ये जोरदार वाऱ्यामुळे घर्षण निर्माण होते. यापासून उडणाऱ्या ठिणगीमुळे हि काजूबागायत हमखास जळून खाक होत असते. दरवर्षी हा प्रकार या काजू बागायतींमध्ये घडत असतो. पण हा प्रकार रोखण्यासाठी सरकारतर्फे अद्याप कोणतीही पावले उचलण्यात आलेली नाही. अशी खंत काजूबागायतदार दिलीप सातर्डेकर, आत्माराम किनळकर यांनी सांगितले.



मये : काजू बागायतीला लागलेल्या आगीत जळून खाक झालेली काजूची झाडे.

एकाच वेळी देऊसभटवाडी व मये शासकीय तंत्रनिकेतनजवळ अशा दोन ठिकाणी एकाच वेळी या विद्यूत वाहिन्यांमध्ये घर्षण होऊन दोन्ही ठिकाणी एकाच वेळी आग भडकण्याची घटना घडले. कालच्याही घटनेत तसेच झाले दोन्ही बाजूला एकाच वेळी घर्षण होऊन काजू बागायतींमध्ये आग लागली व संपूर्ण डोंगरच आगीच्या भक्ष्यस्थानी आले. या आगीच्या भडक्यात सुमारे ८० हजार चौरस मीटर जागेतील पिकलेल्या काजू बागायती जळून खाक झाल्या.

यावर्षीचा मोसम नुकताच सुरू झाला आहे. पहिल्याच टप्प्यातील काजू पिक बहरले असून काजूबोंडू लागले आहेत. हे काजू बोंडू काढून त्यातून आत्ताच कुठेतरी काजूबागायतदारांची कमाई सुरू झाली होती. परंतु दरवर्षीप्रमाणे घडलेल्या या घटनेमुळे पहिल्या टप्प्यातील व यापुढेही येणारे काजू पिक नष्ट झाले आहे. यामुळे आमचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे, असे दिलीप सातर्डेकर व आत्माराम किनळकर यांनी सांगितले.

या काजूबागायतींमधून गेलेल्या विद्यूत वाहिन्यांमध्ये घडणाऱ्या वारंवार या आगीच्या घटनांसंदर्भात संबंधित खाते व स्थानिक अधिकाऱ्यांनाही कल्पान व पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. पण त्याकडे अद्यापही लक्ष दिले जात नाही. सरकार शेती बागायतींसाठी शेतकऱ्यांना भाषणांमधून प्रोत्साहित करते. मात्र सरकारच्याच दुर्लक्षामुळे काजू बागायतदारांना दरवर्षी नुकसानी सोसावी लागत आहे, याकडे सरकारने गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी सातर्डेकर व किनळकर यांनी केली.

# दक्षिण गोव्यात 'हौसी'ची क्रेझ; बक्षिसांचे आकडे लाखांत

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. १२ :** दक्षिण गोव्यात हौसी (तांबोला) खेळाची लोकप्रियता अभूतपूर्व पातळीवर पोहोचली आहे. एकेकाळी लहान प्रमाणावर खेळला जाणारा हा खेळ आता

'हाय होल्टेज' कार्यक्रमात रूपांतरित झाला असून, लाखोंच्या बक्षिसांमुळे नागरिकांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे.

हौसी स्पर्धांमध्ये मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असून, लवकरच नावेली, बाणावली आणि वेर्णा येथे आयोजित होणाऱ्या कोकणी संगीत कार्यक्रमांमध्ये १५ लाख रुपयांच्या बक्षिसांसह सुपर ग्रँड हौसी होणार आहे. याशिवाय, बाणावलीमध्ये १३ मार्च रोजी १० लाख आणि १४ मार्च रोजी ६ लाख रुपयांच्या बक्षिसांसाठी हौसी स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धांच्या वाढत्या लोकप्रियतेमुळे




तिकिटांची विक्री अल्पावधीतच पूर्ण होत आहे.

या स्पर्धांच्या प्रसिद्धीसाठी सोशल मीडियाचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जात असून, महत्त्वाच्या ठिकाणी बॅनर्स आणि पोस्टर्स लावण्यात आले आहेत. हौसीच्या वाढत्या लोकप्रियतेमुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळाली आहे. स्पर्धांच्या आयोजनामुळे स्थानिक हॉटेल्स, खाजगी वाहतूक आणि इतर सेवा व्यवसायांना आर्थिक लाभ होत आहे.

हौसीमध्ये ९० आकड्यांचा समूह असतो. प्रत्येक सहभागीला १५ आकड्यांची तिकिटे दिली जातात. आयोजक यादृच्छिक पद्धतीने आकडे जाहीर करतात आणि खेळाडूंना त्यांच्या तिकिटांवर हे आकडे चिन्हांकित करावे लागतात. टॉप लाईन, मिडल लाईन, बॉटम लाईन, क्विक फाइव्ह आणि फुल हाऊस हे हौसीचे सर्वात लोकप्रिय स्वरूप आहेत. स्पर्धांमध्ये विजेत्यांची नावे कार्यक्रम संपल्यानंतर जाहीर केली जातात आणि विजेत्यांना रोख बक्षिसे तत्काळ देण्यात येतात. त्यामुळे सहभागींसाठी हा खेळ अधिक रोमांचक ठरतो.

अशा स्पर्धांसाठी आवश्यक परवानग्या जिल्हाधिकारी आणि पोलिसांकडून प्राप्त केल्या जातात. मोठ्या रोख बक्षिसांसह या कार्यक्रमांचे आयोजन केल्यामुळे आयोजक आणि सहभागी दोघांमध्ये उत्सुकता आहे.

हौसी स्पर्धांच्या लोकप्रियतेमुळे तिकिटांचे दर वाढले असून, तीन तिकिटांसाठी सुमारे एक हजार रुपये आकारले जात आहेत. बक्षिसांची रक्कम लाखोंमध्ये असल्यामुळे लोक मोठ्या प्रमाणावर सहभाग घेत आहेत. हौसी हा केवळ खेळ राहिला नसून, तो आता संगीत कार्यक्रम, फुटबॉल स्पर्धा आणि कॅराओके स्पर्धांचा अविभाज्य भाग बनला आहे. बक्षिसांच्या रकमेच्या आकारामुळे आणि खेळाच्या थरारक स्वरूपामुळे हौसी हा दक्षिण गोव्यातील सर्वाधिक लोकप्रिय कार्यक्रम ठरत आहे.

# मडगाव मध्ये २३ इमारती अत्यंत धोकादायक !

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. १२ :** मडगावमधील असुरक्षित इमारतींचा प्रश्न अद्याप सुटलेला नाही. दोन वर्षांपूर्वी जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या निर्देशांनंतरही शहरातील अनेक धोकादायक इमारती आजही उभ्या असून त्या नागरिकांच्या सुरक्षेला गंभीर धोका निर्माण करत आहेत. या पार्श्वभूमीवर, असुरक्षित इमारतींच्या समस्येवर त्वरित कारवाई व्हावी, अशी मागणी मडगावकरांकडून होत आहे.

मडगाव नगरपरिषदेने दावा केला आहे की त्यांनी आपली प्रक्रिया पूर्ण केली असून, या इमारतींमुळे होणाऱ्या अस्थिरतेचा धोका लक्षात घेऊन इमारत मालकांना इमारती पाडण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मात्र, अद्याप अनेक मालकांनी या इमारती पाडल्या नाहीत. स्थानिक नागरिक कॉलिन कोहेल्हो यांनी याबाबत सार्वजनिक सुरक्षेच्या दृष्टीने गंभीर ठरणाऱ्या या मुद्द्यावर उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. त्यांनी न्यायालयाने या प्रकरणात त्वरित हस्तक्षेप करून कारवाई करण्याची मागणी केली आहे.

हेराल्डशी बोलताना मडगाव नगरपरिषदेचे अध्यक्ष दामोदर शिरोडकर यांनी सांगितले की, २०२३ मध्ये जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या निर्देशांनंतर नगरपरिषदेने संबंधित इमारतींविषयी प्रक्रिया पूर्ण केली आहे. आमच्याकडे स्वतः इमारती पाडण्याचे अधिकार नाहीत. त्यामुळे आम्ही सार्वजनिक बांधकाम विभागाकडे मदतीसाठी संपर्क साधला आहे. याशिवाय, संबंधित इमारत मालकांना नोटीस देऊन इमारत पाडण्याचे निर्देश दिले आहेत, असे शिरोडकर यांनी स्पष्ट केले. त्यांनी पुढे सांगितले की, मालकांनी स्वेच्छेने संरचना पाडल्या नाहीत, तर संबंधित अधिकाऱ्यांकडून कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

शॅडो कौन्सिलचे संयोजक सॅव्हियो कुतिन्हो यांनी या प्रकरणात नगरपरिषद आणि प्रशासनाच्या दुर्लक्षावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. मडगावमध्ये सुमारे २३ असुरक्षित इमारती आहेत. नगरपालिकेने वर्षानुवर्षे सर्वेक्षण केले असले तरी, या इमारतींच्या दुरुस्ती किंवा पाडण्यासंदर्भात कोणतीही ठोस कारवाई केलेली नाही,असे कुतिन्हो यांनी सांगितले. त्यांनी या इमारतींकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्याने गंभीर सुरक्षा धोका निर्माण झाल्याचा इशारा दिला आहे.

शहरातील नागरिकांची सुरक्षा धोक्यात असून, जिल्हाधिकारी कार्यालयाने या प्रकरणात गांभीर्याने लक्ष घालून त्वरित उपाययोजना करावी. कोणतीही दुर्दैवी घटना घडण्यापूर्वी संबंधित यंत्रणांनी कारवाई करणे गरजेचे आहे,असे कुतिन्हो यांनी ठणकावले. धोकादायक इमारतींसंदर्भातील समस्या लवकर सोडवण्यासाठी प्रशासनाने आणि मालकांनी तत्काळ पुढाकार घेण्याची गरज आहे. अन्यथा, नागरिकांच्या सुरक्षेला धोका निर्माण होण्याची भीती व्यक्त होत आहे.